

दिवाळी २०२२
सकाळ
www.agrowon.com
अॅग्रोवन
आम्ही स्वयंसेवी
शेतकऱ्यांच्या आयुष्यात समृद्धी
पेरणाऱ्या संस्थांच्या यशकथा
किंमत १७० रुपये



स्वप्नभूमीत शिक्षण घेणारी बच्चे कंपनी.

# अनाथ, निराधारांची स्वप्नभूमी



माणिक रासवे

परभणी जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक विकास संस्था (Social Ecomnomic Development Trust-SEDT) अनाथांची स्वप्नभूमी म्हणून ओळखली जाते. या संस्थेमुळे शेकडो अनाथ मुले शिक्षित होऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील झाली. तसेच संस्थेने राबविलेल्या फळबागेच्या वाडी मॉडेलची मधुर फळे अल्पभूधारक आदिवासी शेतकरी चाखत आहेत. ग्रामीण आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातही संस्थेने आपली मोहोर उमटवली आहे.

SEDT

**प**रभणी जिल्ह्यातील केरवाडी (ता.पालम) येथील सामाजिक, आर्थिक विकास संस्था (Social Ecomnomic Development Trust-SEDT) अनाथांची स्वप्नभूमी म्हणून ओळखली जाते. संस्थेचे संस्थापक सूर्यकांत कुलकर्णी यांनी राज्यभरात बालहक्काची चळवळ उभी केली. या संस्थेमुळे शेकडो अनाथ मुले शिक्षित होऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील झाली. तसेच संस्थेने राबविलेल्या फळबागेच्या वाडी मॉडेलची मधुर फळे अल्पभूधारक आदिवासी शेतकरी चाखत आहेत. ग्रामीण आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातही संस्थेने आपली मोहोर उमटवली आहे.

सूर्यकांत कुलकर्णी यांनी पुणे विद्यापीठातून समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी कायनेटिक उद्योगामध्ये तीन वर्षे नोकरी केली. पण त्यांचा ओढा सामाजिक कार्याकडे असल्यामुळे त्यांनी नोकरीला रामराम ठोकला. अनाथांसाठी काम करण्याचं ठरवलं. उद्योगपती हस्तिमल फिरोदिया आणि पानकुंवर फिरोदिया यांनी त्यांना प्रोत्साहन दिलं. कुलकर्णी यांनी सामाजिक कामासाठी आपल्या गावाची म्हणजे केरवाडीची निवड केली. तेथे १९७६ मध्ये सामाजिक, आर्थिक विकास संस्था स्थापन केली. गावातील एका गोदामामध्ये कार्यालय थाटले.


केरवाडीतील आनंदराव पाटील यांनी राज्य रस्त्यालगतची आपली पाच एकर जमीन संस्थेला दान दिली. त्यामुळे संस्थेचे कार्यालय, विविध प्रकल्पांच्या इमारती उभारण्यासाठी जागेचा प्रश्न निकाली निघाला. युनिसेफच्या सहकार्याने १९८८ मध्ये पालम तालुक्यात घरोघरी स्वच्छतागृह उभारणी मोहीम राबविण्यात आली. त्यात राज्य सरकारचा ग्रामविकास विभाग तसेच उद्योजकांचा सहभाग होता. त्यानंतर गरोदर महिला, लहान मुलांच्या लसीकरणासाठी ५० गावांमध्ये जनजागृती केली. कपार्ट अंतर्गत केरवाडी, कांदलगाव आदी गावांमध्ये ५२ सामुदायिक विहिरी खोदण्यात आल्या. शाळा सोडून शेतात काम करणाऱ्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून ५० गावांमध्ये रात्र शाळा सुरू करण्यात आल्या. सुरुवातीला मराठवाडा आणि त्यानंतर राज्य स्तरावर बाल कामगारांसाठी विशेष काम सुरू केले. संस्था बाल हक्क, बाल कामगार, शिक्षण हक्क या मुद्यांवर काम करत आहे.

## शेतीविकासाची आस

परभणी जिल्ह्याची अर्थव्यवस्था मुख्यत्वे शेतीवर अवलंबून आहे. जिल्ह्यातील ७० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. गोदावरी नदीच्या खोऱ्यात काळी कसदार जमीन आहे. डोंगराळ भागात दगडगोट्याची जमीन आहे, तर विविध कारणांनी पिकांची उत्पादकता अन्य जिल्ह्यांच्या तुलनेने कमी आहे. देशातील सर्वांत गरीब जिल्ह्यांच्या यादीत परभणीचा समावेश होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी संस्थेने शेतकऱ्यांना सोबत घेऊन शेतीव्यवस्थेत सुधारणा करण्याचं काम हाती घेतलं. सुमारे एक हजार शेतकऱ्यांसोबत भागीदारी केली आहे. परवडणारी शेती ही संकल्पना राबवली.

## वाडी मॉडेल

नाबार्डच्या आर्थिक साह्यातून आदिवासी समाजासाठी वाडी मॉडेल राबवले जाते. त्या माध्यमातून आदिवासी कुटुंबांना फळबाग लागवडीसाठी साधनांचा पुरवठा केला जातो आणि विक्री साखळीशी जोडले जाते. गुजराती भाषेतील वाडी या शब्दाचा अर्थ छोटी फळबाग असा होतो. ही वृक्षाधारित शेती पध्दती आहे. जोखीम कमी करण्यासाठी दोन किंवा अधिक फळपिकांची लागवड केली जाते. सामाजिक, आर्थिक विकास संस्थेने हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांसाठी २०१३ ते २०२० या कालावधीत हे मॉडेल राबवले.



“ **स्वप्नभूमी प्रकल्पातून अनाथ, निराधारांना आश्रय तसेच शिक्षण दिले जाते. उच्च शिक्षणासाठी त्यांना मदत केली जाते. शेकडो अनाथ मुले शिक्षण घेऊन स्वावलंबी झाली आहेत. काही जण विदेशात स्थायिक झाली आहेत. या मुलांची संस्थेशी नाळ कायम आहे. संस्था शेतीविकासाच्या कामातही सक्रिय आहे. डिस्कव्हरी सायन्स सेंटरद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजत आहे.**

– **सूर्यकांत कुलकर्णी**, कार्यकारी संचालक, सामाजिक, आर्थिक विकास संस्था

## अल्पभूधारकांसाठी जीवनोन्नती प्रकल्प

अल्पभूधारक शेतकऱ्यांची नड लक्षात घेऊन त्यांना पेरणीपूर्वी पतपुरवठा केल्यास ते बियाणे, खते निविष्ठा खरेदी करु शकतील. वेळेवर पेरणी झाली तर चांगले उत्पादन मिळू शकेल. खासगी सावकारीतून होणारी शेतकऱ्यांची लूट थांबू शकेल, या विचारातून जीवनोन्नती प्रकल्प सुरू करण्यात आला. पालम तालुक्यातील पाच गावांतील १० कुटुंबांची निवड करण्यात आली. त्यांना शेती तसेच शेतीआधारित उद्योगासाठी प्रत्येकी १ लाख रुपये अर्थसहाय्य करण्यात आले. प्रत्येक महिन्याला या शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले जाते.

संस्थेची केरवाडी शिवारात तीन एकर शेतजमीन आहे. प्रत्येकी दीड एकर क्षेत्रावर इंडो- इस्राईल पद्धतीने केसर आंबा व सीताफळ लागवड करण्यात आली आहे. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी महिलांचे संघटन करण्यात आले. २०२० मध्ये केवळ महिला शेतकऱ्यांची सखी समृद्धी शेतकरी उत्पादन कंपनी स्थापन करण्यात आली.

## अनाथांची स्वप्नभूमी

सामाजिक, आर्थिक विकास संस्था ही अनाथ मुलांसाठी काम करणारी मराठवाड्यातील पहिलीच संस्था आहे. संस्थेने १० मे १९८० रोजी अनाथ, निराधार, बाल कामगार, भिकारी, गरीब मुलांसाठी स्वप्नभूमी या नावाने जीवन विकास प्रकल्प सुरु केला. या ठिकाणी आश्रितांची संपूर्ण काळजी घेतली जाते. त्यांना प्राथमिक शिक्षण दिले जाते. पुणे येथे महाविद्यालयीन उच्च शिक्षणासाठी मदत केली जाते. सुरुवातीच्या काळात पुण्यातील झोपडपट्टीतील मुले दाखल झाली होती. स्वप्नभूमीमुळे शेकडो अनाथ निराधाराच्या जीवनाला आकार मिळाला. दरवर्षी ७० ते ७५ निराधार मुले प्रकल्पात दाखल होतात.

स्वप्नभूमीमधून शिक्षण घेत सहाशेहून अधिक निराधार मुले स्वतःच्या पायावर उभी राहिली आहेत. आजवर संस्थेने २० हजारांहून अधिक बाल कामगारांची सुटका केली आहे. सूर्यकांत कुलकर्णी हे गेली ४२ वर्षे अनाथ मुलांसाठी काम करत आहेत. त्यांना पत्नी माणिकताई यांची त्यांना खंबीर साथ आहे. त्यांची दोन्ही मुले अजिंक्य आणि आशिष हे पूर्णवेळ संस्थेचे काम करतात.

स्वप्नभूमीत घडलेले कोद्री येथील राम लटपटे म्हणाले, ‘‘वडिलांच्या अकाली निधनानंतर कुटुंबाची आबाळ झाली. शिक्षणाची परवड होत होती. १९९९ मध्ये स्वप्नभूमीमध्ये दाखल झालो. माझ्यासारखी अनेक मुलं तिथं होती. प्रत्येकाच्या समस्या वेगवेगळ्या होत्या. सुरुवातीच्या काळात तिथं करमत

नसायचं. परंतु काही दिवसातच स्वप्नभूमीचा कधी होऊन गेलो ते कळालं नाही. शिक्षणाची आवड कमी असल्यामुळे शाळा फार काही आवडली नाही. संस्थेच्या विकास केंद्रामध्ये व्यावसायिक प्रशिक्षण मिळालं. २०१३ पर्यंत पुण्यात राहण्याची आणि शिकायची संधी मिळाली. समाजकार्य विषयात पदवी घेतली. केरवाडी येथे परत येऊन संस्थेसाठी काम सुरू केलं. गेल्या दहा वर्षांपासून संस्थेच्या प्रत्येक विभागात काम करण्याचा अनुभव घेतला.''

## इनोव्हेटिव्ह सायन्स सेंटर

ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व सृजनशीलता वृद्धिंगत व्हावी, यासाठी केरवाडी येथे हा प्रकल्प सुरू करण्यात आला. या ठिकाणी पाचवी ते दहावीच्या विद्यार्थांना ११० प्रकारचे वैज्ञानिक प्रयोग करण्याची सुविधा आहे. परभणीसह शेजारील जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी या केंद्रास भेटी देतात. राज्य शासनाच्या मदतीने विविध जिल्ह्यांत एकूण १३१ इनोव्हेटिव्ह सायन्स सेंटर सुरू करण्यात आले आहेत. संस्थेने २००५ मध्ये केरवाडी येथे ज्ञानेश्वर विद्यालय सुरू केले. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत ३४० विद्यार्थी संख्या आहे. चाइल्ड हेल्पलाइन या उपक्रमाद्वारे हरवलेली मुले, बाल विवाह, बालमजुरी आदी विषयांवर पालक-मुलांचे समुपदेशन केले जाते. त्यांना कायदेशीर, तांत्रिक मार्गदर्शन केले जाते. सामाजिक आरोग्य उपक्रमांतर्गत एचआयव्हीसंदर्भात जाणीवजागृती केली जाते. बाधित रुग्णांची तपासणी करुन त्यांना मार्गदर्शन केले जाते. कौटुंबिक छळ होत असलेल्या महिलांना कायदेशीर मदत करून आधार दिला जातो. युनिसेफ, नाबार्ड, चाइल्डलाइन इंडिया फाउंडेशन, केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागांकडून मिळणाऱ्या निधीतून संस्था प्रकल्प राबवते. नेदरलॅण्ड येथील के टोम्पोट आणि अमेरिकेतील वाय. एस. गीव्हज या व्यक्ती सढळ हाताने मदत करतात. मेट्रोपोलिस, एचसीएल फाउंडेशन, अभिजात ट्रस्ट आदी संस्था सीएसआर फंड उपलब्ध करुन देतात. संस्थेचे कार्यकारी संचालक म्हणून सूर्यकांत कुलकर्णी काम पाहतात. दीपक क्षीरसागर, यशवंत पाटील, चंद्रशेखर अकोलकर, हेमंत पारडीकर, नितीन शितोळे, वैशाली जोशी, कुमार वैद्य हे विश्वस्त मंडळात आहेत. गंगा माने मुख्य सचिव आहेत. डी. आर. सारंग व्यवस्थापक आणि प्रल्हाद पांचाळ मुख्य लेखापाल आहेत.



बचत गटाची महिला सदस्या ट्रॅक्टर चालविताना.

### कार्यगौरव

१९९२ मध्ये फाय फाउंडेशनतर्फे सूर्यकांत कुलकर्णी यांचा गौरव करण्यात आला. २००४-०५ मध्ये कॅनडातील ओटावा येथे आयोजित आंतरराष्ट्रीय बालकामगार परिषदेत कुलकर्णी सहभागी झाले होते. पुणे येथील यशदामध्ये २००३ ते २००६ या कालावधीत त्यांनी सल्लागार म्हणून काम केले. 'यशदा'मध्ये बाल हक्क विभाग सुरू करण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे.



महिला पतसंस्थेची बैठक.

संपर्क : सूर्यकांत कुलकर्णी, ९८२२००८३००, डी. आर. सारंग, ९९२२९१४१०२, प्रल्हाद पांचाळ, ९९२२९१४१०५
www.sedtindia.org, sedtindia@gmail.com